क्रमांक : १७४

## महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## सोमवार, दिनांक १९ नोव्हेंबर, २०१८ / कार्तिक २८, १९४० (शके)

### १७४. :: म.वि.स. नियम २९२ व म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्तावाच्या सूचना ::

१. महाराष्ट्र विधानसभेच्या सोमवार, दिनांक १९ नोव्हेंबर, २०१८ पासून विधान भवन, मुंबई येथे सुरु होणाऱ्या सन २०१८ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनासाठी द्यावयाच्या म.वि.स. नियम २९२ प्रस्तावाच्या सूचना LWMOIS (अंतिम आठवडा प्रस्ताव) व म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्तावाच्या सूचना PIMOIS (सार्वजनिक बाबींवर चर्चा) या आज्ञावली (WEB PORTAL) व्दारे सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत Online पध्दतीने तसेच प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालयात सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत Offline पध्दतीने स्वीकारण्यात येतील.

२. महाराष्ट्र विधानसभा नियम २९२ तसेच नियम २९३ नुसार द्यावयाच्या सूचना म.वि.स. नियमाच्या तरतूदीनुसार असणे आवश्यक असून Offline पध्दतीने उक्त सूचना देताना सदस्यांनी त्या आपल्या लेटरहेडवर ३ प्रतीत सादर कराव्यात.

३. Offline पध्दतीने देण्यात येणाऱ्या म.वि.स. नियम २९२ व म.वि.स. नियम २९३ प्रस्तावाच्या सूचनेवर एका पेक्षा जास्त सदस्यांच्या स्वाक्षऱ्या असतील तर स्वाक्षरीच्या खाली सदस्यांनी आपले नाव व नावांचा क्रम स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे.

४. Offline पध्दतीने देण्यात येणाऱ्या प्रस्तावाच्या सूचना या सदस्य किंवा सदस्यांचे अधिकृत स्वीय सहायक अथवा संबंधित विधिमंडळ पक्ष कार्यालयातील अधिकृत ओळखपत्र असलेल्या कर्मचाऱ्यांकडून स्वीकारण्यात येतील. अन्य खाजगी व्यक्तींमार्फत सदस्यांनी पाठविलेल्या सूचना तसेच सन्माननीय सदस्यांच्या लेटरहेड व्यतिरिक्त अन्य कोणत्याही स्वरुपातील प्रस्तावाच्या सूचना स्वीकारण्यात येणार नाहीत व विचारात देखील घेतल्या जाणार नाहीत याची कृपया सर्व सन्माननीय सदस्यांनी नोंद घेऊन आवश्यक सहकार्य करावे.

५. म.वि.स. नियम २९२ व म.वि.स. नियम २९३ प्रस्तावाच्या सूचना स्विकृती संबंधी व स्विकृत सूचना चर्चेला घेणे संबंधीचा पूर्ण अधिकार मा.अध्यक्षांचा राहील.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : १९ नोव्हेंबर, २०१८**

**डॉ.अनंत कळसे,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
३) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव.
४) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
६) संगणक कक्ष (WEBSITE)
७) एम.के.सी.एल.